# रे. मु. क. ०६/२०१०

**श्री पुरुषोत्तम पी. भुजबळ ....वादी**

**विरुध्द**

**श्री. किसन राघोजी भुजबळ ....प्रतिवादी**

## निशाणी क. १५५ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादींनी त्यांचे विरुध्द झालेले **"एकतर्फा आणि विनाकैफियत आदेश"** रद्द करुन मिळणे करीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीची थोडक्यात हकीगत अशी की, प्रतिवादी क. ६/१ ते ६/३ यांनी **निशाणी क. १३८** व्दारे दिनांक १२.०१.२०१७ रोजी दाव्यास कैफीयत आणि मनाई हुकूमास जबाब दाखल केले आहे. प्रस्तुत प्रतिवादीनी अदयापपर्यंत जबाब व कैफियत दाखल केलेली नाही. त्यांना **निशाणी क. १३८** कडील जबाब व कैफियत स्विकारायची आहे. त्याकरीता पुरशिस दाखल करावयाची आहे. प्रस्तुत प्रतिवादीना त्यांची जबाब व कैफियत दाखल करणेकरीता झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफियत वजा पुरशिस दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता आणि एकतर्फा आदेश रद्द करुन मिळण्याची विनंती त्यांनी केली.

३. वादीने त्याच अर्जावर लेखी जबाब देवुन हरकत घ ेतली आहे. प्रतिवादीतर्फे विलंब माफी करीता देण्यात आलेली कारणे योग्य, समर्पक आणि कायदेशीर स्वरुपाची नाहीत. प्रतिवादीना कैफियत दाखल करण्यास सरासरी ८ वर्षाहुन आधिक विलंब झाला आहे. एवढया प्रदिर्घ कालावधीचा विलंब का

झाला याचे स्पष्टीकरण अर्जामध्ये करण्यात आलेले नाही. न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजुर केल्यास प्रतिवर्षी झालेल्या विलंबास प्रत्येक प्रतिवादीकडुन रक्कम रुपये २५,०००/- या प्रमाणे दंड अकारण्यात येवुन ती रक्कम वादीना देण्यात यावी.

४. सदरचा अर्ज, म्हणणे आणि कागदपत्रांचे अवलोकन करुन दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जात नमुद केल्याप्रमाणे काही प्रतिवादी विरुध्द एकतर्फी आदेश तर काही विरुध्द विनाकैफियत आदेश दिनांक ३०.११.२०१३ रोजी झाला आहे.

६. प्रतिवादी तर्फे वकील श्री. एस.एम. लाड यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. ६/१ ते ६/३ यांनी त्यांची कैफियत मुदतीत **निशाणी क १३८** कडे दाखल केली आहे. प्रस्तुत प्रतिवादीना तिच कैफियत स्विकारावयाची आहे. प्रस्तुत प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. त्यांनी **मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या कुलदिप उमरावसिंग ओस्तवाल विरुध्द चंद्रकांत पटेल, २०१० ऑल एम आर.(सप्लीमेंट्री)१६२** मधील निवाडयाचा दाखला देवुन युक्तीवाद केला की, प्रतिवादीनी त्याचे म्हणणे मुदतीत दाखल केले असेल आणि कैफियत दाखल करण्यास विलंब झाला असेल तर ते म्हणणे तो पुरशिस दाखल करुन कैफियत म्हणुन स्विकारु शकतो. याउलट, वादी तर्फे वकील श्री. मोंडे यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीना कैफियत दाखल करण्यास सरासरी ८ वर्षापेक्षा जास्त विलंब झाला आहे. त्यांनी प्रत्येक दिवसाचे स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

७. प्रतिवादी क्र. ६/१ ते ६/३ यांनी **निशाणी क्र. १३८** कडे त्यांची जबाब व कैफियत दिनांक १२.०१.२०१२ रोजी दाखल

केली आहे. प्रस्तुत प्रतिवादीना ती कैफियत स्विकारावयाची आहे. परंतु, प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द 'एकतर्फा' आणि 'विना कैफियत आदेश' दिनांक ३०.११.२०१३ रोजी केले आहेत. ते आदेश रद्द करणे कामी अर्ज करण्यासाठी देखील प्रतिवादींना विलंब झाला आहे. तो का झाला आहे, याबाबतीत कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी अर्जात नमुद केलेले नाही. प्रस्तुत प्रतिवादींपैकी काही प्रतिवादी वकीलांमार्फत हजर झाले होते. त्या वकीलांनी कैफियत दाखल केलेली नाही. एवढेच कारण प्रतिवादीनी या अर्जात नमुद केले आहे. ते कारण संयुक्तीक वाटत नाही.

८. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या कुलदिप (उपरोक्त) मधील निवाडयाचे मी बारकाईने अवलोकन केले. त्यातील अपीलार्थीने सामनेवाला विरुध्द दावा दाखल केला होता. सामनेवालेनी **निशाणी क १२** कडे अंतरिम मनाई हुकूमाच्या अर्जास जबाब दाखल केला होता. तो जबाब त्यांची कैफियत म्हणुन समजणेत येणेबाबतची पुरशिस दाखल केली. ती संपरिक्षा न्यायालयाने दिनांक ३०.०१.२०१० रोजी स्विकारली. त्या आदेशा विरुध्द वादीने प्रस्तुतची याचीका दाखल केली होती. सामनेवालेने मुदतीत दाखल केलेला जबाब हा कैफियत म्हणुन स्विकारला जावू शकतो. मा. उच्च न्यायालयाने अर्जदाराची याचीका फेटाळली.

९. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क. ६/१ ते ६/३ यांनी दाखल केलेली **निशाणी क. १३८** वरील कैफियत इतर प्रतिवादी पुरशिस दाख्ल करुन स्विकारु ईच्छीत आहेत. त्यासाठी त्यांना झालेला विलंब माफ करण्याची विनंती ते या अर्जाव्दारे करत आहेत. कुलदिप (उपरोक्त) मधील कथने प्रस्तुत प्रकरणातील कथनापेक्षा भिन्न स्वरुपाची आहेत. त्यामुळे तो निवाडा प्रतिवादीच्या उपयोगाचा

नाही.

**१०.** प्रस्तुत प्रतिवादीना दिनांक ३०.११.२०१३ रोजीचा आदेश रद्द करणेसाठी ५ वर्षापेक्षा जास्त विलंब झाला आहे. सदरचा दावा निकषांवर निकाली काढणेकरीता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. ती अभिलेखावर आली नाही तर या प्रतिवादीना त्यांचे बचावाची संधी मिळणार नाही. त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विंलब दंड आकारुन माफ करणे मला योग्य वाटते. म्हणुन, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## :: आदेश ::

**१. सदरचा अर्ज मंजुर केला.**

**२. प्रस्तुत प्रतिवादीनी प्रत्येकी रुपये ३,०००/- वादीस पुढील तारखेस अथवा पुर्वी दंडापोटी अदा केलेस त्यांचे विरुध्द करण्यात आलेले ''एकतर्फा आणि विना कैफियत'' आदेश विलंब माफ करुन रदद करणेत येतात.**

**३. प्रस्तुत प्रतिवादीना प्रतिवादी क्र.६/१ ते ६/३ यांनी नि.क्र १३८ कडे दाखल केलेली कैफियत स्विाकरण्याची परवानगी देणेत येते. त्यांनी त्याबाबतची पुरशिस पुढील तारखेस अथवा पुर्वी सादर करावी.**

**पनवेल** **(ए. यु. बहिर)**
**दि. १६/१२/२०१९** **२रे सह दि. न्या. व. स्तर, पनवेल**